**।। ॐ श्री साईराम ।।**

**'साई पर्ल्स ऑफ व्हिजडम'**

**साई ज्ञानमौक्तिके**

भगवान साईबाबांच्या चरणकमलांना वंदन

भाग १७ ड

ॐ ॐ ॐ

## ''प्रशिक्षक कणखर असला पाहिजे.''

पुढची कथा एका दुसऱ्या दिवसाशी संबंधित आहे. त्या दिवशी स्वामी सकाळी महाविद्यालयात आले. मुले कवायतीचे संचलन करत असलेली त्यांनी पाहिलं. त्यांनी सर्व मुलांना संचलन करताना पाहिलं, एका शाळेमागे दुसरी शाळा, एका तुकडीमागे दुसरी तुकडी अशा पद्धतीत ते व्यासपीठासमोरून जात होती. स्वामी त्याचं निरीक्षण करीत होते. आम्हाला वाटलं स्वामींना खूप आनंद झाला असेल; पण त्या संध्याकाळी त्यांनी प्रत्येकाला सांगितलं, ''योग्य संचलनासाठी शिक्षण आणि शिस्तीची फार गरज असते. अशा संचलनाची तयारी करून घेताना प्रशिक्षकाने विद्यार्थ्यांच्या बाबतीत खूप कडक असलं पाहिजे. ते दयाळू किंवा मृदू असू शकत नाहीत. ते खूप कडक शिस्तीचे असायला हवे. ''स्वामींनी त्यांच्या कमलापूरमधील शालेय दिवसांमध्ये घडलेल्या एका प्रसंगाविषयी आम्हाला सांगितलं. कडप्पा जिल्ह्यात कमलापुरम् नावाचं ठिकाण आहे. तिथे स्वामींनी काही दिवस शालेय शिक्षण घेतलं. स्वामी म्हणाले, ''माझ्या शालेय शिक्षणाच्या दिवसात, एक कवायत शिक्षक होते. ते फार कडक शिस्तीचे होते. जेव्हा काहीही चूक होई, तेव्हा ते मुलांना छडीने मारत असत, ते चाबकाने फटके मारत. फारच कडक! पालक त्याबद्दल तक्रार करायला आले की तुम्ही माझ्या मुलाला का मारता? तर ताबडतोब कवायत शिक्षक उत्तर द्यायचे की तुम्ही तुमच्या मुलाला शिक्षण घ्यायला आमच्याकडे पाठवलं आहे. तुम्हाला हे शिक्षण नको असेल तर त्याला घरी घेऊन जा.'' ''सध्याचे शिक्षक फार मवाळ असतात. त्यामुळे त्यांच्याकडून मुलांना काही शिकता येत नाही.'' स्वामींनी संचलन कसं करायचं हेसुद्धा सांगितलं. ''तुम्ही कवायत करत असताना तुमचे पाय तुम्ही वाकवायला नकोत. तुमचे हात दोन्ही बाजूला मोकळेपणाने हलले पाहिजेत. जेव्हा तुमचा एक पाय पुढे पडतो, तेव्हा हात पूर्णपणे मागे गेला पाहिजे, संचलन म्हणजे- 'डावे-उजवे, डावे-उजवे' म्हणून हात मोकळेपणाने हलले पाहिजेत. असं हे योग्य संचलन असतं. पुढे स्वामी म्हणाले, ''संचलनाचे दोन प्रकार आहेत. ब्रिटीश मार्चिंग आणि जर्मन मार्चिंग. (हशा) भारतामध्ये ब्रिटनची कवायत पद्धत स्वीकारली गेली आहे. म्हणून तुम्ही बिनचूक, निर्दोषपणे संचलन करायला हवे. संचलन करताना टाचांचा जमिनीला स्पर्श होता कामा नये. जरासुद्धा जमिनीला टेकता कामा नये. अगदी असं- अगदी असं- स्वामींनी संचलन कसं करायचं ते मुलांना दाखवलं. ''मी तुमच्यासमोर काही देखावा करीन नाहीये.'' (अनिलकुमारांनी स्वामींनी जसं दाखवलं होतं तसं करून दाखवलं.) (हशा) ते आम्हाला संचलन कसं करावं ते दाखवत होते. सावकाश संचलन कसं असतं ते दाखवलं. जेव्हा स्वामी संचलनाविषयी बोलत होते, तेव्हा त्यांचे हातसुद्धा हेलकावत होते. 'स्वामींना हेदेखील कसं माहीत आहे?' अशा भावनेने प्रशिक्षक आणि सैन्य अधिकाऱ्यांच्या भुवया उंचावल्या होत्या. (हशा) ओह! असं का? पण मित्रांनो हे आपण लक्षात घेतले पाहिजे की साई म्हणजे जागरुकता. जागरुकता ही संपूर्ण समजली पाहिजे, थोडी थोडी नाही, तुकड्या तुकड्यांनी नाही. खरं तर, स्वामी पूर्ण जगाला संचलन करायला लावतील- डावे-उजवे! त्यांना संचलन येणार नाही असं आपल्याला का वाटावं? त्यांना सर्व माहीत आहे.

## ‘‘निष्ठा ही पूर्णत्त्व आणते.’’

अशाच एका दिवशी स्वामी प्राथमिक शाळेत आले होते. त्यांनी मुलांचे कार्यक्रम पाहिले आणि प्रतिक्रिया दिली, ‘‘पहा बरं! ही प्राथमिक शाळेतील मुले जितकं शक्य तितकं उत्तमच करतात. का? कारण मुलं अत्यंत निष्ठावान असतात. तुम्हा लोकांच्यात तुमचं वय आणि ताकद असते. तुमच्यामध्ये अहंभावही असतो. म्हणून तुम्ही तितके निष्ठावान नसता. लहान मुलांच्यात अहंभाव नसतो; ती फार चांगली असतात, ती निष्कपट असतात. तुम्ही मुलं कार्यक्रमाच्या फलनिष्पत्तीचा विचार करता, त्याच्या विजयाचा विचार करता. तुम्ही निकाली परिणामावर लक्ष केंद्रित करता. पण लहानगी मुलं स्वामींकडे पाहतात आणि कामाला सुरूवात करतात. हीच गोष्ट त्यांना यश मिळवून देते, हे समजून घ्या! प्राथमिक शाळेच्या मुलांच्या कार्यक्रमांइतके तुमचे कार्यक्रम मनोरंजक, उत्सुकतापूर्ण झाले नाहीत.’’ (हशा) नंतर बाबांनी मुलांना सांगितलं, ‘‘मुलांनो, त्या छोट्या छोट्या मुलांकडे पाहा. त्यांना कसलीही भीती नाही, ते कुठेही चढू शकतात, माकडासारखी. याउलट तुम्हाला खूप भीती वाटत असते. नेपोलियन आणि चर्चिल किती धाडसी होते, माहीत आहे? ते किती शूर होते ते तुम्हाला माहीत आहे? ते म्हणाले, ‘‘ठाम राहा. बाकी सर्व आपोआप होईल.’’ याचा स्पष्ट अर्थ म्हणजे ज्या गोष्टी तुम्हाला करायच्या आहेत याची तुम्हाला स्पष्ट कल्पना असेल तर यश हे निश्चितपणे तुमच्या पाठोपाठ येईल. म्हणून मुलांनो, भीती न बाळगता, प्रार्थना करा आणि धाडसाने काम करा.’’

२००१ सालचे खेळांचे कार्यक्रम संपले. आपल्या मुलांना प्रशिक्षण देण्यासाठी आलेल्या सैनिकी प्रशिक्षकांना स्वामींनी मुलाखत दिली. तेथे ९ प्रशिक्षक आले होते. ‘‘तुम्ही माझं बोलणं तल्लीनतेने, एकाग्रतेने ऐकताना पाहतो.’’ मग स्वामींनी हात हलवला (जसे काहीतरी वस्तू सृजित करताना ते हात हलवतात तसे) एकदम ९ घड्याळे साक्षात झाली (हशा) एकाच वेळी नऊ! (हशा) त्यांनी प्रत्येकाला एक याप्रमाणे वाटायला सुरुवात केली. प्रत्येक जण म्हणत होता, ‘‘हेच खरे बाबा!’’ स्वामींनी विनोद करायला सुरूवात केली आणि त्यांना निरोप देताना, त्यांनी ९ अंगठ्या एकदम साक्षात केल्या आणि प्रत्येकाला एकेक दिली! प्रत्येकाच्या बोटात अंगठी अगदी चपखल बसली. असे हे भगवान बाबा!

## ‘‘जाणीवांचे समाधान पुरेसे असते.’’

नंतर मी म्हणालो, ‘‘स्वामी, या वर्षीच्या खेळातील कार्यक्रमातील आपल्या मुलांच्या आकर्षक प्रदर्शनाचे लोक भरभरून कौतुक करत आहेत हे तुम्हाला सांगण्यास मला खूप आनंद होत आहे.

बाबा म्हणाले, ‘‘तू इतका वाहवत जाऊ नकोस! लोकांनी केलेल्या कौतुकाने हुरळून जाऊ नकोस. लोकांनी तुझी स्तुती करावी किंवा निंदा करावी; जर तुझं मन समाधानी असेल तर सगळं मिळालं. ते सर्वांत महत्त्वाचं आहे. तुमच्या स्तुतीने गर्व बाळगू नका किंवा निंदेने निराश होऊ नका.’’

मी म्हटलं, ‘‘मी या गोष्टींना योग्य नाही. माझा कुठलाही दोष नसताना लोक माझी निंदा करतात, तेव्हा मला फार वाईट वाटतं. साहजिकच लोक माझी स्तुती करतात, तेव्हा मी उत्साहित होतो. शेवटी मीसुद्धा माणूसच आहे, हे तुम्ही जाणताच. जर कुणी मला म्हणालं, ‘‘अनीलकुमार, तू तुझं काम छान करत आहेस’’ तेव्हा मला छान वाटते. (हशा) मला आणखी काम करण्याचा उत्साह येतो. याउलट जर कुणी म्हणालं, ‘‘काय हे, कसलं काम? हे इतक्या उच्च दर्जाचं नाही.’’ मग मी निरुत्साही होतो, स्वामी.’’

बाबा म्हणाले, ‘‘या जगात चांगलं आणि वाईट असं नसतंच. जे तुमच्यासाठी चांगलं असतं ते दुसऱ्यासाठी वाईटही असू शकेल. जे दुसऱ्यांसाठी चांगलं असतं ते तुमच्यासाठी वाईटही असू शकेल. तेव्हा तुम्ही दुसऱ्या माणसाच्या मताचा विचार का करता? तसा विचार करू नका.’’

## ‘‘तुम्ही प्रत्येकासाठी प्रार्थना केलीत तर तुमची इच्छाही पूर्ण होईल.’’

मग स्वामींनी एक उदाहरण दिलं. ‘‘एका घरी लग्नसोहळा संपन्न होणार होता. साधारण त्याच वेळेस, एक

शेतकरी चांगलं पीक यावं म्हणून बी पेरण्यासाठी पावसाची वाट पाहत होता. तो पहिला माणूस, जो लग्नसोहळ्याची तयारी करत होता, तो देवाची प्रार्थना करत होता, ''देवा, उद्या पाऊस पडायला नको. कारण माझ्या घरी लग्नसमारंभ आहे; आणि अगदी त्याच वेळी, त्याच रस्त्यावर शेतकरी प्रार्थना करत होता, ''देवा, जोराचा पाऊस पडू दे रे, (हशा) म्हणजे मला पेरणी करता येईल. मग माझं शेत पिकासाठी तयार होईल, पीक चांगलं येईल आणि भरपूर अन्नधान्य उगवेल. अशा तऱ्हेने एकजण पाऊस येण्यासाठी प्रार्थना करीत आहे, आणि दुसरा पाऊस येऊ नये म्हणून प्रार्थना करत होता.''

''ओह्! स्वामी, किती छान उदाहरण दिलंत. तेव्हा मी काय करावं? (हशा) कारण हे दुसऱ्या कोणासाठी चांगलं नसतं तर तुम्हाला प्रार्थना करण्याचं मी थांबवू का? माझ्यासाठी जे चांगलं त्यासाठी मी प्रार्थना करू शकत नाही का?'' ''नाही.'' ''स्वामी, मग मी काय करायला हवं?'' बाबा म्हणाले, ''प्रत्येकासाठी प्रार्थना कर. जर तू प्रत्येकासाठी प्रार्थना केलीस, तर तुझ्यासुद्धा इच्छा पूर्ण होतील. शेतकऱ्यासाठी पाऊस पडेल आणि लग्नाच्या वेळेस पाऊस नसेल. जर तुझी प्रार्थना स्वार्थापोटी असेल आणि तू शेतकऱ्यासारखा पावसासाठी प्रार्थना केलीस, तर इतरत्र सगळीकडे दुष्काळ पडेल; आणि जर तू स्वार्थापोटी कोरड्या हवेची प्रार्थना केलीस, तर सर्वत्र जोराचा पाऊस पडेल, आणि लग्नसमारंभाला अपयश येईल. नेहमी प्रत्येकाच्या चांगल्यासाठी प्रार्थना करा. त्यामुळे तुमच्या इच्छाही पूर्ण होतील.''

''प्रशांतिनिलयम ही एक मोठी कार्यशाळाच आहे.''

मग मी म्हणालो, ''स्वामी, सांगायला समाधान वाटतं की हे लष्करातील लोक इथे आलेत, इथल्या कार्यक्रम पद्धतीत बरोबर बसू शकले (रुळले). इथे त्यांना खूप समाधानकारक वाटलं.'' बाबा म्हणाले, ''नाही, नाही! आपल्या पद्धतीनं राहण्याकरता त्यांना तसं बदलावं लागलं. (हशा) या पद्धतीत राहण्यासाठी ते तयार नाही. या पद्धतीनं त्यांना बदलायला भाग पाडलं. त्यामुळे ते इथे राहू शकले.''

नंतर त्यांनी इकडे पाहिलं आणि म्हणाले, ''प्रशांति निलयम् ही मोठी कार्यशाळा आहे. या सर्व गाड्या दुरुस्तीसाठी इथे येतात, मी त्या दुरूस्त करतो आणि परत पाठवून देतो, त्यामुळे बराच काळ त्या बिघडत नाहीत.''

''मी जिथे असतो, तिथं तुम्ही आनंदी असावं''

''स्वामी, मला एक शेवटचा प्रश्न विचारायचा आहे.''

''काय प्रश्न आहे?''

''स्वामी, आता बंगलोरला हॉस्पिटल बांधलं जातंय, तर बऱ्याच लोकांना असं वाटतंय की तुम्ही पूर्वी इथे जितके दिवस राहात होतात, त्यापेक्षा जास्त वेळ बंगलोरमध्ये राहाल.'' स्वामी म्हणाले, ''मी असं कोणालाव सांगितलेलं नाही. (हशा) तुम्ही अशा अफवा का पसरवता? (हशा) इकडे पहा अनीलकुमार, मी इकडे किंवा तिकडे, कुठेही असलो, तरी तुम्ही सर्वांनी आनंदात, सुखात असावं असं मला वाटतं. तुम्ही खूप खूप समाधानी, आनंदी असावं हेच मला हवं आहे. तुम्ही सर्वांनी शांततेनं राहा. तेच माझ्यासाठी फार महत्त्वाचं आहे. मी देहानं तिथं असेन, पण मनाने सर्व ठिकाणी असेन.''

ह्याबरोबरच सन २००१ मधील या महिन्याच्या घटनांची समाप्ती होत आहे.

ॐ लोका: समस्ता सुखिनो भवन्तु।

ॐ लोका: समस्ता सुखिनो भवन्तु।

ॐ लोका: समस्ता सुखिनो भवन्तु।।

ॐ शांति, शांति, शांति:।।

***